क्रमांक :
दिनांक : २२. ०२. १०.

संपादक,
———————————

सप्रेम नमस्कार,

‘मराठी भाषा दिना’च्या निमित्ताने मुंबई विद्यापीठाचा मराठी विभाग आणि विद्यापीठाचा जनसंपर्क विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने ‘मराठीचा विकास आणि संस्थात्मक व्यवहार’ या विषयसूत्रावर एक परिसंवाद शुक्रवार, दिनांक २६ फेब्रुवारी १० रोजी सकाळी १० वाजता कविवर्य कुसुमाग्रज मराठी भाषा आणि साहित्य भवन, विद्यानगरी, सांताक्रुझ, मुंबई ९८ येथे आयोजित केला जाणार आहे.

संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेला आज पन्नास वर्षे पूर्ण झालेली आहेत. या पन्नास वर्षांमध्ये मराठी भाषेच्या विकासाच्या संदर्भात पडलेले अनेक प्रश्न सोडवण्याचा आपण प्रयत्न करत आहोत. या प्रयत्नांमध्ये संस्थात्मक पातळीवरील प्रयत्नांनाही महत्त्वाचे स्थान आहे. महाराष्ट्रामध्ये मराठीच्या विकासासाठी राज्य शासनाच्या आणि इतरही वेगवेगळ्या प्रकारच्या संस्था क्रियाशील असलेल्या पाहावयास मिळतात. या संस्थांनी मराठीच्या विकासासाठी कोणते कार्य केले, हे कार्य करताना त्यांना कोणत्या प्रकारच्या अडचणी आल्या, कोणत्या योजना पूर्ण होऊ शकल्या नाहीत, त्या का पूर्ण होऊ शकल्या नाहीत, याचा एक लेखाजोखा मांडला गेला तर आपल्या पुढील प्रयत्नांना तो उपयुक्त ठरू शकेल. या हेतूनेच ‘मराठी भाषा दिना’च्या निमित्ताने प्रस्तुत परिसंवादाचे आयोजन करत आहोत.

आपण आपल्या वृत्तपत्रामध्ये वरील परिसंवादास प्रसिद्धी द्यावी आणि आपला प्रतिनिधी अवश्य पाठवावा, अशी विनंती या पत्राद्वारे करत आहे. सोबत परिसंवादाची निमंत्रणपत्रिका पाठवत आहे.

कळावे, लोभ असावा,

आपला,

(श्री० आशुतोष राठोड)
उपकुलसचिव, जनसंपर्क विभाग.